# मुंबई विद्यापीठ

# निमंत्रण

सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाचे विभाग/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य, मॉडेल कॉलेज (मंडणगड, तळेरे) आणि प्राचार्य, जे.जे कॉलेज ऑफ आर्किटेक्चरयांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ही एकछत्री योजना देशभरात लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १८ विविध उद्दीष्टे असून त्या उद्दिष्टाअंतर्गत या योजनेमधून निधी संबंधित संस्थांना मंजूर करण्यात येतो. या संदर्भात केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने देशभरातून रूसा अंतर्गत पूर्ण केलेल्या भौतिक सुविधांच्या कामांच्या गुणवत्तेच्या आधारे १० राज्यांची निवड केली आहे. यात महाराष्ट्र राज्याच्या वतीने सादर करण्यात आलेल्या प्रकल्पामधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या डिजिटल क्लासरूम आणि इ–कंटेन्ट लर्नींग मॉडयुल यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे राज्याच्या वतीने उद्घाटन श्रीमती स्मृती इराणी, मंत्री, माननीय केंद्रिय मनुष्यबळ विकास, नवी दिल्ली यांच्या हस्ते दिनांक ०३ जून २०१६ रोजी सकाळी ११.०० ते १.३० या दरम्यान होणार आहे.

तरी रूसाच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विविध योजनांची जाणिव मुख्यत्वे शिक्षक व विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात होण्याच्या दृष्टीकोनातून या उद्घाटन सोहळयाचे लाइव्ह वेबकास्ट LED/LCD स्क्रीन किंवा प्रोजेक्टरवर आपल्या महाविद्यालयात / संस्थेत http://webcast.gov.in/mhrd; http://mhrd.gov.in या लिंकवरून करण्यात यावा.

तसेच मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील संबंधीतांकरिता सदर सोहळयाचे लाइव्ह वेबकास्ट **व्हच्युअल क्लासरूम, सर फिरोजशहा मेहता भवन, राज्यशास्त्र विभाग, विद्यानगरी परिसर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८** येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे व आपल्या विभागातील / महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत कळवावे, हि विनंती.

सही/–
(डॉ अनिल पाटील)
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

मुंबई ४०० ०९८
३१ मे २०१६

प्रति,

सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाचे विभाग/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य, मॉडेल कॉलेज (मंडणगड, तळेरे) आणि प्राचार्य, जे.जे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर

******

प्रत माहिती करिता रवाना:

१. वित्त व लेखा अधिकारी
२. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग
३. विद्यापीठ अभियंता, विद्यानगरी परिसर
४. उपकुलसचिव, प्रशासन विभाग, विद्यानगरी परिसर
५. कुलगुरूंचे स्वीय सहायक
६. कुलसचिवांचे स्वीय सहायक
७. संचालक, म.वि.वि.मं. यांचे स्वीय सहायक